# आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी - ०२२ - २२६४००६३/६५
०२२ - २२७१ ७५००
फॅक्स - ०२२ २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार,
पी. डिमेलो रोड, सीएसटी जवळ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.


(२४१५-६२५)

राआअ/आशा/ Team Base Incentive / /१७
दिनांक : २४ नोव्हेंबर २०१७.

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

विषय - आशा स्वयंसेविका योजना
Team Based Incentive संदर्भातील मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्हास्तरावरुन कार्यवाही अनुसरण्याबाबत..

संदर्भ - १) सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा मंजूर प्रकल्प अमंबलजावणी आराखडा.
२) मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक यांची मंजूर टिपणी दिनांक २२ नोव्हेंबर २०१७.

उपरोक्त संदर्भान्वये, केंद्र शासनाने संदर्भ क्र.१, अन्वये, आशा स्वयंसेविका योजनेच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखडयात एफ.एम.आर कोड बी - १.१.३.६.१.८ व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या आशा स्वयंसेविका योजनेच्या प्रकल्प अमंलबजावणी आराखडयात एफ.एम.आर कोड बी - १.१.३.६.६ अंतर्गत आशा स्वयंसेविका, ए.एन.एम व अंगणवाडी सेविका यांना Team Based Incentive अदा करण्याकरीता मंजूरी दिलेली आहे. तरी, सोबत जोडलेल्या विस्तृत मार्गदर्शक सुचनेच्या आधारावर सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील उपकेंद्राच्या कामागिरीच्या आधारावर सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात Team Based Incentive संदर्भातील चा कामावर आधारीत मोबदला अदा करण्यात यावा. तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील Team Based Incentive संदर्भातील कामावर आधारीत मोबदला सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात माहे एप्रिल २०१८ मध्ये वर नमूद एफ.एम.आर.आर कोड मधून जिल्हा/तालूका/प्रा.आ.केंद्रस्तरावरील उपलब्ध निधीतून अदा करण्यात यावा.

तसेच, सोबत जोडलेल्या मार्गदर्शक सुचनेच्या आधारावर सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता जिल्हयांतील किती उपकेद्र कोणत्या निकषास ( ८० ते ११० गुण ६० ते ७९ गुण) पात्र ठरत आहे. माहिती उपलब्ध करुन दयावयाचे प्रपत्र खालील प्रमाणे आहे.

प्रपत्र क्र.१

| अनु. क्र. | जिल्हयांचे नांव | तालूक्यांची संख्या | प्रा.आ. केद्रांची संख्या | एकूण उपकेद्रांची संख्या | प्रोत्साहन भत्ता गणना करण्यात आलेल्या उपकेंद्रांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | (खालील दिलेल्या वर्गवारीत पात्र उपकेंद्रांची संख्या नमूद |

दुरध्वनी – ०२२ – २२६४००६३/६५
०२२ – २२७१ ७५००
फॅक्स – ०२२ २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार,
पी. डिमेलो रोड, सीएसटी जवळ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.


| | | | | | करावी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ८० ते ११० | ६० ते ७९ | ५९ च्या खाली |

प्रपत्र क्र.२

| अनु. क्र. | जिल्हयांचे नांव | प्रोत्साहन भत्ता गणना करण्यात आलेल्या उपकेंद्रांची संख्या | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (खालील दिलेल्या वर्गवारीत पात्र उपकेंद्रांची संख्या नमूद करावी) | | | | | | | | |
| | | ८० ते ११० | | | ६० ते ७९ | | | ५९ च्या खाली | | |
| | | उपकेंद्रातील ASHA,ANM,AWW यांची संख्या नमूद करावी | | | | | | | | |
| | | आशा | ए. एन. एम | अंगणवाडी सेविका | आशा | ए. एन. एम | अंगणवाडी सेविका | आशा | ए. एन. एम | अंगणवाडी सेविका |

या कार्यालयाकडून सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर दिनांक २१ डिसेंबर २०१७ पर्यत वर नमूद तक्तां क्र.१ व २ मध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने माहिती उपलब्ध करुन देण्यात दयावी. सदर माहितीच्या आधारावर उपकेंद्र निहाय निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

(डॉ.सुनिल पाटील)
सहसंचालक (तांत्रिक)
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
महाराष्ट्र

प्रत – माहितीस्तव,सविनय सादर

- मा.अतिरिक्त संचालक, राज्य कुटूंब कल्याण कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव..
- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व यांना माहितीस्तव सादर
- विभागीय कार्यक्रम व्यवस्थापक, आरोग्य सेवा, परिमंडळे, सर्व.
- जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा परिषद, सर्व.
- जिल्हा लेखा व्यवस्थापक, जिल्हा परिषद, सर्व.
- जिल्हा मुल्यांकन व सनियंत्रण अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
- जिल्हा समूह संघटक, जिल्हा परिषद, सर्व.
- तालूका आरोग्य अधिकारी, तालूका कार्यालय, सर्व
- तालूका समूह संघटक, तालूका कार्यालय, सर्व.

# आशास्वयंसेविका, एएनएम व अंगणवाडी सेविका यांच्या गटासाठी कामगिरीवर आधारीत गटप्रोत्साहन भत्ता अदा करणेबाबत मार्गदर्शक सुचना

DRAFT

पार्श्वभुमी -

आशा स्वयंसेविका, एएनएम व अंगणवाडी सेविका या गावपातळीवर समन्वयाने आरोग्य सेवा पुरविण्याची महत्वपूर्ण भुमिका पार पाडत असतात आणि ज्यामुळे आरोग्य व पोषण निर्देशंकामध्ये सुधारणा दिसून येते. सर्व लाभार्थ्यांना वेळापत्रकाप्रमाणे दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्यासाठी व या गटास प्रोत्साहीत करण्यासाठी त्यांना कामगिरीवर आधारीत गटप्रोत्साहन भत्ता अदा करण्यात यावा. सदर प्रोत्साहन भत्त्यामुळे त्यांच्या कामकाजात उत्तम समन्वय, सामुहिक प्रेरणा वृध्दींगत होऊन विविध आरोग्य उपक्रम अधिक परिणामकारक पध्दतीने राबविण्यास मदत होणे अपेक्षित आहे.

प्रोत्साहन भत्ता देण्याच्या पध्दती -

अ) **प्रोत्साहन भत्ता वितरण स्तर** :- उपकेंद्र (उपकेंद्राची कामगिरीचे मुल्यांकन करुन प्रोत्साहन भत्ता वितरीत करण्यात यावा.)

ब) **प्रोत्साहन भत्ता अदा करावयाचा गट** :- उपकेंद्रा अंतर्गत येणाऱ्या सर्व आशा, ए.एन.एम. व अंगणवाडी सेविका यांच्या गटास कामगीरीच्या आधारावर प्रोत्साहन भत्ता अदा करण्यात यावा.

क) **कालावधी/वारंवारिता:-** उपकेंद्रांतर्गत सर्व आशा, एएनएम व अंगणवाडी सेविका यांच्या गटाची मागील आर्थिक वर्षाची कामगिरी उपकेंद्र निर्देशांक गुणांकनाच्या तुलनात्मक विश्लेषनाच्या आधारे निश्चित करुन प्रोत्साहन भत्ता हा वर्षातून एकदा/वार्षिक अदा करण्यात यावा. तसेच प्रोत्साहन भत्ता ७५:१५:१० या प्रमाणा नुसार आशा, एएनएम व अंगणवाडी सेविका यांना विभागून देण्यात यावा.

**ड) प्रोत्साहन भत्ता देण्याचे निकष :-**

**१) निर्देशांक गुणांकनाच्या आधारे प्रोत्साहन भत्ता मोजण्याची पध्दत :-**

**१.१) उपकेंद्राची कामगिरी मोजण्यासाठी निर्देशकांची निवड**

एचएमआयएस/ हिवताप/ आरएनटीसीपी/ एनएलईपी अहवालातून उपलब्ध माहिती व्दारे काही निर्देशांकांची निवड करण्यात आली आहे. या निर्देशांकाच्या आधारावर उपकेंद्राच्या कामगिरीचे मुल्यांकन करण्यात येईल. या निर्देशकांची माहिती खालील तक्ता क्रमांक १ मध्ये देण्यात आली आहे.

(सदरच्या निर्देशांकाचा उपकेंद्राचा आकडा वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी नमूद केलेल्या माहिती स्त्रोताच्या आधारे भरुन तालुका आरोग्य अधिकारीव्दारे तपासणी करुन जिल्हास्तरावर पाठवावा)

### १.२) निवडलेल्या प्रत्येक निर्देशांकाचे स्वतंत्र गुणांकन

नमूद माहिती स्त्रोताच्या आधारे निवडलेल्या प्रत्येक निदेशांकाचे चालू अर्थिक वर्षातील (डिसेंबर महिन्यातील) माहिती व त्यापूर्वीच्या आर्थिक वर्षातील (डिसेंबर महिन्यातील) माहिती यांचे तुलनात्मक विश्लेषण करावे. विश्लेषण करते वेळी निर्देशकांत काही वाढ झाली आहे किंवा नाही हे तपासावे आणि त्यानुसार प्रत्येक निर्देशांकाला गुण देण्यात यावा.

**तुलनात्मक दृष्टया**

- जर निर्देशांकामध्ये काही वाढ झाली नसेल वा याउलट घरसरण झाली असेल तर त्या निर्देशांकाला ० गुण देण्यात यावा.
- जर निर्देशांकामध्ये वाढ झाली असेल तर प्रत्येकी एक टक्का वाढीसाठी एक गुण देण्यात यावा. एका निर्देशांकाकरीता गुणांची कमाल मर्यादा १० इतकी असून जर निर्देशांकामध्ये १० टक्यांपेक्षा अधिक वाढ झाली असल्यास त्या निर्देशांकाला कमाल मर्यादा असलेले १० गुण देण्यात यावे.
- ज्या उपकेंद्राने मागील वर्षी तक्ता क्रमांक १ मध्ये तत्सम निर्देशांकाच्या उच्चतम ध्येय गाठलेला असेल व चालू वर्षी

    १) त्या निर्देशांकात घसरण झाली असेल तर ० गुण देण्यात यावे.

    २) त्या निर्देशांकात वाढ झाली नसेल व तो तसाच राहिला असेल तर उच्चतम ध्येय नियमित ठेवण्यासाठी ५ गुण देण्यात यावे.

    ३) त्या निर्देशांकात वाढ झाली असेल तर उच्चतम ध्येय नियमित ठेवण्यासाठीचे ५ गुण व उच्चतम ध्येयाच्या वर जितकी टक्के वाढ झाली असेल तितके वाढीव गुण देण्यात यावे.

### १.३) सर्व निवडक निर्देशकांच्या गुणांची एकत्रित गणना करुन उपकेंद्राचे एकूण गुण काढणे.

प्रत्येक निर्देशांकाच्या गुणांची बेरीज करुन एकूण गुण काढण्यात यावे. तसेच जर उपकेंद्र आदिवासी क्षेत्रात येत असेल तर निर्देशांकाच्या एकुण गुणांकामध्ये १० गुण अतिरिक्त जोडण्यात यावेत.

### १.४) उपकेंद्राची एकूण गुणांच्या आधारे विभागणी

एकूण गुणांच्या आधारे खालील तक्ता क्र. २ नुसार एकूण गुण श्रेणीनुसार उपकेंद्र गटास अनुरुप प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा. तसेच जिल्हयाकडे या कार्यक्रमाच्यासाठी उपलब्ध रक्कमेपेक्षा अधिक उपकेंद्र पात्र ठरत असल्यास उपकेंद्राला प्राप्त एकूण गुणांनुसार रॅकींग करावी आणि त्यातून पात्र उपकेंद्र गटाची प्रोत्साहन भत्ता देण्याकरीता निवड करावी.

**तक्ता क्रमांक २**

<table>
<tr><td colspan="3">निर्देशांक गुणांकन व प्रोत्साहन भत्ता गणना</td></tr>
<tr><td>एकूण निर्देशांक-</td><td>११</td><td rowspan="3">• ८० ते ११० गुणांकनाकरीता: १००% (रु ५०,०००) प्रोत्साहन भत्ता<br>• ६० ते ७९ गुणांकनाकरीता: ५०% (रु. २५,०००) प्रोत्साहन भत्ता</td></tr>
<tr><td>एकूण वार्षिक गट प्रोत्साहन भत्ता (रु.)</td><td>५०,०००</td></tr>
<tr><td>गटाचे कमाल</td><td>११०</td></tr>
</table>

DRAFT

| | | | |
|---|---|---|---|
| गुण मर्यादा | | • ७५:१५:१० या प्रमाणात आशा आ.से. व अंगणवाडी सेविका या प्रमाणे वितरीत केले जाईल.<br>• ५९ गुणा खालील उपकेंद्रातील गटांना कोणताही प्रोत्साहन भत्ता अदा केला जाणार नाही | |
| *प्रोत्साहन भत्ता गणना* | | | |
| एकूण गुण श्रेणी | ८० ते ११० | ६० ते ७९ | ५९ व त्या खालील |
| प्रोत्साहन भत्त्याची रक्कम | रु ५०,००० | रु.२५,००० | ० |

२) महत्वपुर्ण बाबी -

- **सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात कोणत्याही प्रकारचा कामावर आधारीत मोबदला प्राप्त न करणाऱ्या आशा स्वयंसेविकेस "प्रोत्साहन भत्ता" अदा करण्यात येवू नये. अशावेळी उर्वरित काम करणाऱ्या आशा स्वयंसेविकेमध्ये सदर मोबदला समप्रमाणात वाटप करुन दयावा.**
- **सदर प्रोत्साहन भत्ता कंत्राटी ए.एन.एम/नियमित ए.एन.एम यांना समप्रमणात वाटप करुन दयावा.**
- **सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात सहा महिने किंवा सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधीकरीता ए.एन.एम ने कार्यभार सांभाळला नसल्यास त्या ए.एन.एम. ला सदर मोबदला अदा करण्यात येवू नये. अशावेळी त्याच उपकेद्रातील दुसऱ्या ए.एन.एम. ला संपुर्ण प्रोत्साहनपर भत्ता अदा करण्यात यावा.**
- **सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात सहा महिने किंवा सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधीकरीता अंगणवाडी सेविकेने (सर्व प्रकारच्या अंगणवाडी केद्र) कार्यभार सांभाळला नसल्यास त्या अंगणवाडी सेविकेस सदर मोबदला अदा करण्यात येवू नये.**

३) पडताळणीची जबाबदारी-

- उपकेंद्र स्तरावर मार्गदर्शन व पर्यवेक्षणाची संपूर्ण जबाबदारी वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र यांची राहील.
- तालुकास्तरावरील मार्गदर्शन व पर्यवेक्षणाची संपूर्ण जबाबदारी तालुका आरोग्य अधिकारी यांची राहील.
- जिल्हास्तरावरील मार्गदर्शन व पर्यवेक्षणाची संपूर्ण जबाबदारी जिल्हा आर.सी.एच अधिकारी यांची राहील.
- जिल्हास्तरावर माहिती संकलन, पडताळणी व गुणांकनाची जबाबदारी जिल्हा सनियंत्रण व मुल्यमापन अधिकारी (M& E officer) यांची राहील.
- सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मासिक आढावा बैठक, कार्यक्षेत्र सनियंत्रण, पर्यवेक्षण व वार्षिक अहवालाचे अवलोकन हे अविभाज्य भाग राहतील. करीता सदर मार्गदर्शक सुचना प्राप्त झाल्यानंतर माहे ४ डिसेंबर २०१७ ला वर नमूद घटकांची एकदिवसीय बैठक जिल्हास्तरावर आयोजित करुन मार्गदर्शन करण्यात यावे.
- दिनांक ६ डिसेंबर २०१७ रोजी तालूकास्तरावर तालूका आरोग्य अधिकारी यांनी बैठक आयोजित करुन प्रा.आ.केंद्रस्तरावरील या कार्यक्रमात सहभागी घटकांना एकत्रितपणे मार्गदर्शन कार्यक्रमाची रुपरेषा/मार्गदर्शक सुचनाबाबत अवगत करावे.

DRAFT

- दिनांक १४ डिसेंबर २०१७ पर्यंत प्रा.आ.केंद्रस्तरावरुन तालूकास्तरावर प्रपत्र क्र.१ व २ मध्ये प्रोत्साहनपर भत्त्यांची माहिती वैदयकिय अधिकारी, प्रा.आ.केद्र हे स्वाक्षरीसह तालूका आरोग्य अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देतील.
- दिनांक १८ डिसेंबर २०१७ पर्यंत तालूकास्तरावरुन प्रपत्र क्र.१ व २ मध्ये प्रोत्साहनपर भत्त्यांची माहिती तालूका आरोग्य अधिकारी हे स्वाक्षरीसह जिल्हा आरोग्य अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देतील.
- दिनांक २१ डिसेंबर २०१७ पर्यंत जिल्हास्तरावरुन प्रपत्र क्र.१ व २ मध्ये प्रोत्साहनपर भत्त्यांची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी हे स्वाक्षरीसह मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राआअ, मुंबई, महाराष्ट्र यांना आशा स्वयंसेविका योजनेच्या ई-मेल आय-डीवर (dcmasha530@gmail-com) यांना माहिती उपलब्ध करुन देतील.

DRAFT

## तक्ता क्र. १ उपकेंद्रस्तारावर गट प्रोत्साहन भत्ता गणना करण्यासाठीची/भरावयाची निर्देशांक पत्रिका

| अ. क्र. | निर्देशांक | निर्देशांक/घटकांची विस्तृत माहिती | महिती चे स्त्रोत | उच्चतम ध्येय | SC ची मागील वर्षाची निर्देशांक टक्केवारी | SC ची चालू वर्षाची निर्देशांक टक्केवारी | निर्देशांक टक्केवारी वाढ/फरक | निर्देशांक गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | A | B | C | E | F | G | H | I |
| 1 | Proportion of Pregnant Women registered in the 1st Trimester (within 12 weeks)of total registered | **Numerator:** Out of total ANC registered number registered within 1st Trimester (12 Weeks) **Denominator:** Total number of pregnant women registered for ANC | HMIS/sub-center register | >95% | | | | |
| 2 | Proportion of Pregnant women received 4 ANC checkups of total registered | **Numerator:** Number of pregnant women received more than 4 ANC checkups **Denominator:** Total number of pregnant women registered for ANC | HMIS/sub-center register | >80% | | | | |
| 3 | Proportion of Pregnant women given 180 IFA tablets of total registered | **Numerator:** Number of pregnant women given 180 IFA tablets **Denominator:** Total number of pregnant women registered for ANC | HMIS/sub-center register | >75% | | | | |
| 4 | Proportion of Institutional deliveries against total deliveries | **Numerator:** Number of institutional deliveries conducted **Denominator:** Total deliveries conducted (institution plus home deliveries) | HMIS/sub-center register | 80% | | | | |
| 5 | Proportion of Newborns breastfed within one hour of birth | **Numerator:** Number of Newborns breastfed within one hour of birth **Denominator:** Total number of live births | HMIS/sub-center register | >80% | | | | |
| 6 | Proportion of Women receiving 1st PNC visit within 48 hours and 14 days | **Numerator:** Number of Women receiving 1st PNC visit within 48 hours and 14 days **Denominator:** Total deliveries | HMIS/sub-center register | >90% | | | | |
| 7 | Proportion of fever cases seen for whom RDK test undertaken | **Numerator:** Total no. of fever cases for whom RDK test done **Denominator:** Total no. of Fever cases identified | Malaria Report | >90% | | | | |
| 8 | Proportion of people with fever/cough and weight loss for more than 2 weeks referred for sputum examination | **Numerator:** Total no. of people with fever/cough and weight loss for more than 2 weeks referred for sputum examination **Denominator:** Total no. of people identified with fever/cough and weight loss for more than 2 weeks | HMIS/sub-center register/ Nikshay Report | >90% | | | | |

DRAFT

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | Proportion of people with hypo-pigmented lesions who are referred | **Numerator:** Total no. of people with hypo-pigmented lesions who are referred **Denominator:** Total no. of people identified with hypo-pigmented lesions | HMIS/sub-center register /LCTS - NLEP Portal | >90% | | | | |
| 10 | Children fully immunized less than one year | **Numerator**: Children fully immunized between 9 to 11 months **Denominator:** Total live births | HMIS/sub-center register | >80% | | | | |
| 11 | Penta 3 to Measles 1 Dropout rate (**टिप** : या निदेशकांत Dropout rate गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी झाला असेल तर जितक्या टक्यांनी कमी झाला आहे तितके गुण देण्यात यावे) | **Numerator:** Pentavalent 3 – Measles 1 **Denominator:** Pentavalent 3 (Since it is a negative indicator a percentage decrease will be given one score) | HMIS/sub-center register | 0% | | | | |
| | **एकूण गुण** | | | | | | | |

DRAFT